No. of Printed Pages : 5 **FMT–01**

# स्नातक उपाधि कार्यक्रम (बी. डी. पी.)

## सत्रांत परीक्षा

## जून, 2025

## एफ.एम.टी.–01 : मराठी में आधार पाठ्यक्रम

समय : 2 घण्टे अधिकतम अंक : 50

***नोट :*** ***सर्व*** *प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबन्ध लिहा : 10

(अ) पर्यावरण आणि विकास

(ब) भ्रष्टाचार

(क) माझा आवडला लेखक

(ड) महामारी (कोरोना)

2. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : 8

(अ) संत हे मानव रूपातले देवच असे तुकाराम का म्हणतात ?

(ब) ‘जे न देखे रवी। ते देखे कवी’, असे केशवसुत का म्हणतात ?

(क) बा. सी. मर्ढेकर कोळसेवाल्याची आकृती कसे रेखटतात ?

(ड) ‘कातर वेळ’ या कथेत अक्काला वेड लावणार स्वागत कोणते ?

3. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 6

(अ) ‘वळीव’ या कथेत लेखकाने ‘अंगठी’वर कसा विनोद केला, तुमच्या शब्दात लिहा.

(ब) ‘चेलमा’ सम्पूर्ण दलित समाजाचे प्रतिनिधित्व करते, चर्चा करा.

(क) आकाशाकडे पाहतांना लेखकाला कोणते प्रश्न भेडसावतात ?

(ड) कुंजा सांबर मारण्यासाठी जंगलात का गेला ?

4. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर टीपा लिहा : 6

(अ) ‘गुंड्या भाऊचे दुखणे’ मधील डॉ. त्रिवेदीचे व्यक्तीमत्व चित्रण करा.

(ब) संगणक आणि मानवी जीवन

(क) बालगंधर्वाचे प्रयोगातील श्रम

(ड) न्याय मंडळाची कार्ये

5. व्यंजन म्हणजे काय ? व्यंजनाचे उच्चारण कसे होते, त्याची उच्चारणस्थाने कोणती ? 5

**किंवा**

खालीलपैकी **एका** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(अ) वाघाच्या घरी शेळी पाहुणी

(ब) अरोग्य हे ऐश्वर्य

(क) घरची करते देवा-देवा बाहेर चीले हलवा-मेवा

6. खालीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : 3

(अ) अंग काढून घेणे

(ब) नाकी नऊ येणे

(क) गचांडी देणे

(ड) अन्नपाणी सोडणे

(इ) गुळणी धरुन बसणे

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) 'सुख पाहता जवापाडे, दु:ख पर्वता ऐवढे'

(ब) राजाला रोजच दिवाळी

(क) 'जगी सर्व सुखी असा कोण आहे ?'

(ड) आग खाईल तो कोळशे ओकेल

(इ) कामा पुरता मामा

7. खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : 4

(अ) ललितकृतींना राष्ट्रीय संपत्तीचे स्वरूप केव्हा प्राप्त होते ?

(ब) जाहिरातलेखनासाठी कोणते गुण हवेत ?

(क) भाऊरावांनी स्वावलंबी शिक्षणाचा आग्रह धरला, व तो कृतीत आणला.

(ड) 'स्त्री' कडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे, साधक–बाधक चर्चा करा.

8. खालील इंग्लिश उतऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Once two women had a quarrel over a small baby. Each claimed that she was the mother of the child. They were brought before a judge. The judge listened to both the women. It was really a difficult case to decide. The judge was confused. After thinking deeply the judge found out the solution. He ordered one of his men, "Cut the child into two parts. Let each woman have one part".

On hearing the judge's order, one of the women screamed out loudly and said, "Mercy, your Lordship. Let that woman have the baby. Let the poor thing live. I give up my claim to it." The other woman remained quite.

The wise judge recognized the real mother. He gave the baby to the woman who was ready to give up her claim. He sent the other woman to jail.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : 4

मनुष्याचा जीवनपट त्याच्या ललाटावरच रेखाटलेला असतो. जे, जे आयुष्यात घडते, ते–ते सारे मागील जन्मातील पापपुण्याचे फळ असते. जीवन म्हणजे पूर्वसंचिताचा खेळ आहे. आपण कितीही जरी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, तरी होणारे कधीच चुकायचे नाही.

आपल्याला दिसणाऱ्या सर्व वस्तू नाशवंत आहेत. जन्ममरणाचा फेरा कुणालाच चुकला नाही. जीवनात जी दु:खे वाटयाला येतात, ती दैवगतीमुळे येत असतात. समद्रात लाटे सरशी दोन ओडंके एकत्र येतात काही कालाने दुसरी एक लाट येते व या ओंडक्याची ताटातूट होते. हाच न्याय मानवी प्राण्यांनाही लागू आहे. योगायोगाने आपण एकत्र येतो, थोडावेळ सुखदु:खात सहभागी होतो. पण अशीच एक लाट येते की त्यावेळी आपण एकमेकांपासून कायमचे दुरावतो. हे जे सारे घडते ते पूर्वसंचितानुसारच घडत असते. त्यात दोष कोणालाच देता येत नाही. मनुष्य हा दैवापुढे पराधीन आहे. शेवटी असे म्हणावे लागेल, पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.

× × × × ×